यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक - ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

Yashwantrao Chavan Maharashtra
Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : www.ycmou.ac.in • https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_shu@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231475

मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा / School of Humanities & Social Sciences

# द रिडिंग क्लब (वाचन कट्टा) उपक्रम

जगभरात वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. "वाचन कट्टा" हा एक सामाजिक आणि बौद्धिकदृष्ट्या समृद्ध करणारा उपक्रम भारतात आणि इतर अनेक देशांमध्ये लोकप्रिय होत आहे. डिजिटल युगातही वाचन संस्कृती टिकवण्यासाठी ऑनलाइन पुस्तक चर्चा, ई-ग्रंथालये आणि वाचन गट यासारखे उपक्रम उपयुक्त ठरत आहेत. ऑक्सफर्ड आणि केंब्रिज विद्यापीठ (यूके) येथे विद्यार्थ्यांसाठी बुक क्लब्स आणि रीडिंग सर्कल्स मध्ये साहित्यिक कादंबऱ्या, संशोधन निबंध किंवा समकालीन लेखनावर चर्चा होते. विद्यापीठीय ग्रंथालयांमध्ये सुद्धा वाचन तास आणि लेखकांसोबत संवाद कार्यक्रम घेतले जातात. हार्वर्ड आणि एमआयटी (अमेरिका) येथे "Great Books Program" नावाचा उपक्रम चालतो, जगातील उत्तम साहित्य कृतींचे वाचन आणि त्यावर चर्चा केली जाते. काही ठिकाणी वाचन गट तयार करून, विषयानुरूप पुस्तकांची देवाणघेवाण केली जाते. भारतात सुद्धा लिटरेचर फेस्टिवल विविध ठिकाणी भरवले जात आहेत ज्यात असे उपक्रम घेतले जातात.

द रिडिंग क्लब 'वाचन कट्टा' हा वाचनप्रेमींना संवाद आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी एक खुला मंच आहे. येथे निवडक समकालीन पुस्तके, लेख, लेखक, विविध साहित्यप्रकार, आत्मकथने, चरित्र्ये, कलाकृती, चित्रपट यावर चर्चा केली जाते, एकमेकांचे वाचनाबद्दलचे अनुभव शेअर केले जातात.

सर्वांच्या सहमतीने व सहभागाने होणाऱ्या या उपक्रमाद्वारे विविध सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवर चर्चा करण्याची संधी सर्वाना प्राप्त होते. सर्जनशीलता व वैचारिक नाविन्यता निर्माण करण्यासाठी हा खुला मंच उपयुक्त व उपक्रमशील असून तो दिशादर्शक ठरू शकतो. मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेत हा उपक्रम राबवण्यासाठी त्या अनुषंगाने नियमावली केली आहे.

## द रिडिंग क्लब 'वाचन कट्टा' उपक्रमाची नियमावली

'वाचन कट्टा' हा उपक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी खालील नियमांचे पालन करून हा उपक्रम अधिक प्रभावी करता येईल.

### सर्वसाधारण नियमावली

- मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेत कार्यरत द रिडिंग क्लब 'वाचन कट्टा' सर्वांसाठी खुला आहे.
- द रिडिंग क्लब 'वाचन कट्टा' मध्ये वाचकाला पुस्तक निवडण्याचे पूर्ण स्वतंत्र आहे.
- सर्वांनी नियोजित वेळेत सहभागी होणे अनिवार्य आहे.
- या उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन ठरलेल्या वेळेत उपस्थित राहावे.
- 'वाचना कट्टा' उपक्रमात सहभागींनी चर्चेत सहभागी होऊन टिपणे काढावीत .
- उत्कृष्ट वाचकाला वर्षाच्या शेवटी मा. संचालक प्रोत्साहित करतील.
- 'वाचन कट्टा' उपक्रमाचे सर्व आयोजन व नियोजन हे मा. संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा यांच्या मार्गदर्शनाखाली होईल. त्यासाठी समन्वयक म्हणून विद्याशाखेत कार्यरत संयोजकांपैकी एकाची निवड मा. संचालक करतील.

- ‘वाचन कट्टा’ उपक्रम प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी आयोजित केला जाईल. सार्वजनिक सुट्टी किंवा काही कारणास्तव त्या दिवशी उपक्रम झाला नाही तर त्याच्या दुसऱ्या कार्यालयीन दिवशी हा उपक्रम सायंकाळी ०४ ते ०५ या वेळेत होईल.
- वाचकाच्या परवानगीशिवाय द रिडिंग क्लब मधील सादरीकरणाचे Video/Audio रेकॉर्डिंग करता येणार नाही.
- उपस्थितांना विद्याशाखेकडून चहा /कॉफी दिली जाईल.

## द रिडिंग क्लब 'वाचन कट्टा' उपक्रमातील वाचकांसाठी नियमावली

### १. वाचन आणि ग्रंथचर्चा

- वाचकाने दिलेल्या वेळेत एकाच पुस्तकावर चर्चा करावी.
- चर्चेची वेळ एक तास असेल. त्यामध्ये ४० मिनिटे पुस्तकाविषयी तर २० मिनिटे उपस्थितांचे प्रश्न, संवाद, शंका निरसन, माहितीमध्ये भर या करिता असेल.
- वाचकाने निवडलेल्या पुस्तकाचे वाचन दिलेल्या वेळेत पूर्ण करावे.
- ग्रंथचर्चेवेळी आपले विचार स्पष्ट आणि समर्पक पद्धतीने मांडावेत. श्रोत्यांच्या प्रश्नांना नेमके व समर्पक उत्तर द्यावे. अनावश्यक चर्चा टाळावी.
- चर्चेच्या विषयाशी संबंधित मुद्द्यांवरच चर्चा करावी. चर्चा ठरलेल्या वेळेत पूर्ण करावी.
- कोणत्याही कारणास्तव अनुपस्थित राहण्याची गरज असल्यास 'वाचन कट्टा' समन्वयक यांना पूर्वसूचना द्यावी.
- निवडलेल्या पुस्तकावर नियोजित वाचकाने चर्चा करावी. चर्चा एका तासापेक्षा जास्त नसावी. त्यामध्ये उपस्थित श्रोत्यांचे प्रश्न उत्तरे, श्रोते-संवाद अपेक्षित आहे.
- वाचकाने स्वखर्चाने / ग्रंथालयातून पुस्तकाची व्यवस्था करावी.
- वाचकाने स्वत:चे पुस्तके आणावे, त्यासाठी विद्याशाखेतून खर्च अदा केला जाणार नाही.
- वाचनासाठी वाचकांना पुस्तक निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र आहे. वाचनासाठी निवडलेली पुस्तके सर्वांसाठी उपयुक्त असावीत.
- वाचन साहित्य निवड करताना सर्व वाचकांच्या आवडी आणि साहित्यिक मूल्यांचा विचार केला जावा.
- कोणत्याही जात, धर्म, लिंग किंवा समाजघटकांविषयी द्वेष पसरवणाऱ्या किंवा वादग्रस्त विषयांवरील साहित्य निवडले जाणार नाही, याची दक्षता पुस्तक वाचकांनी घ्यावी.

### संवाद आणि शिष्टाचार

- वाचकाने पुस्तक सादरीकरणाची भाषा सभ्य आणि नम्र वापरावी. चर्चेदरम्यान आदरयुक्त भाषा वापरणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा अपमान, वाद किंवा वादग्रस्त चर्चा टाळाव्यात.
- वाचकाने पुस्तकाव्यतिरिक्त अनावश्यक चर्चा करू नये. विषयाच्या संबधीत दाखले, उदाहरणे वाचक देऊ शकतात.
- वाचक पुस्तकाची मांडणी करतांना PPT किंवा मुद्दे यांचे विश्लेषणात्मक मांडणी करू शकता. PPT द्वारे सादरीकरण असेल तर कट्टा समन्वयक यांना एक तास अगोदर सूचना करणे आवश्यक आहे.
- वाचन कट्ट्याशी संबंधित माहिती शेअर करताना गोपनीयता आणि परवानगीचे नियम पाळावेत.
- वाचकाची मते / युक्तिवाद स्वत:चा असेल, त्यास समन्वयक, मा. संचालक, विद्याशाखा किंवा विद्यापीठ जबाबदार धरले जाणार नाही.
- मा. संचालक यांनी वेळोवेळी केलेल्या सूचना व नियम सर्वांना बंधनकारक आहे.

## द रिडिंग क्लब 'वाचन कट्टा' समन्वयक यांच्याकरिता नियमावली

- 'वाचन कट्टा' समन्वयक हे संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा यांच्या सूचनेनुसार 'वाचन कट्टा' समन्वयकाची जबाबदारी पार पडतील. समन्वयकांनी वाचन कट्ट्याच्या बैठका वेळच्या वेळी घ्याव्या. बैठकांचे वेळापत्रक तसेच वाचकाशी लेखी पत्रव्यवहार हा वाचन कट्टा उपक्रम आयोजनाच्या आठ दिवस अगोदर करावा. त्याचे ठरवून पालन करावे. वाचन कट्ट्याच्या बैठकीचे वेळापत्रक मा. संचालक यांच्या परवानगीने 'वाचन कट्टा' समन्वयक यांनी बनवून विद्याशाखेत कार्यरत सर्वांच्या निदर्शनास आणावे, तसेच सूचना फलकावर सुद्धा आठ दिवस अगोदर सूचना प्रसिद्ध करावी. सूचनेत दिनांक, वेळ व स्थळ तसेच पर्यायी वाचक यांचा उल्लेख करून सभागृह जबाबदारी, तांत्रिक बाबी या 'वाचन कट्टा' समन्वयक यांनी पहाव्यात.
- संयोजन: वाचन कट्ट्याचे नियोजन करणे, वेळापत्रक तयार करणे आणि कार्यक्रम आयोजित करणे.
- संचालन: चर्चा आणि कार्यक्रम प्रभावीपणे पार पडण्यासाठी समन्वय साधणे.
- अभिप्राय संकलन: चर्चेसाठी सहभागींच्या अभिप्रायावर आधारित उपक्रम सुधारणा करणे.
- वाचन कट्टा उपक्रम सुरु असतांना फोटो व सहभागींची उपस्थितीची नोंद उपक्रम वहीत नोंद घेणे आवश्यक आहे.
- वाचन कट्ट्यामध्ये झालेल्या चर्चेची माहिती परवानगीशिवाय बाहेर शेअर करू नये.
- 'वाचन कट्टा' समन्वयक यांनी उपक्रम झाल्यानंतर दोन दिवसात सविस्तर अहवाल लेखन करून मा. संचालकांच्या मान्यतेसाठी सादर करावा.
- वर्षभरात राबवलेला वाचन कट्टा या उपक्रमाचे सविस्तर अहवालाचे /नोंद वहीचे संकलन / सर्व फाइल या विद्याशाखा कार्यालयात वर्षाच्या शेवटी जमा कराव्यात.

ही नियमावली द रिडिंग क्लब 'वाचन कट्टा' उपक्रमाचा योग्य आणि परिणामकारक उपयोग करण्यास मदत करेल. या नियमांचे पालन करून आपण एक सुसंस्कृत, समृद्ध आणि विचारमंथन करणारे व्यासपीठ घडवू शकतो.

**प्रा. नागार्जुन वाडेकर**
**संचालक तथा प्रमुख, वाचन कट्टा उपक्रम**
**मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा**

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा * य.च.म.मु.वि., नाशिक * ज्ञानगंगा घरोघरी